कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,इंदापूर जि. पुणे

मराठी विभाग आयोजित

शैक्षणिक सहल

शैक्षणिक वर्ष 2018-19

विद्यार्थी सूचना

दि. 25/10/2018

मराठी विभागातील सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की मराठी विभागाकडून दि. 12/12/2018 रोजी उजनी जलाशय येथे शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले आहे. ज्या विद्यार्थ्यांना या सहलीमध्ये सहभागी व्हावयाचे आहे. त्यांनी आपली नावे दि.30/11/2018 पर्यंत डॉ. राजकुमार शेलार यांच्याकडे नोंदवावी. विद्यार्थ्यांनी येताना आपल्या पालकाचे सहलीसाठीचे संमती पत्रक घेऊन यावे.

मराठी विभाग प्रमुख

प्रा.डॉ.राजाराम प्रभाकर गावडे
मराठी विभाग प्रमुख,
कला,विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय
इंदापूर,जि.पुणे, 413 106

PRINCIPAL
ARTS, SCIENCE AND
COMMERCE COLLEGE
INDAPUR-413106 DIST-PUNE

Scanned with CamScanner

प्रा. डॉ. राजाराम प्र. गावडे.
मराठी विभाग प्रमुख,
कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय.
इंदापूर जि. पुणे.
दि. 9-09-2019

प्रति,
मा. प्राचार्य,
कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय
इंदापूर जि. पुणे.

विषय :- पक्षी निरीक्षणास परवानगी मिळणे बाबत.....

महोदय,

वरील विषयास अनुसरून आपणास विनंती की मौजे कुंभारगाव येथे एक दिवसीय सहल पक्षी निरीक्षणासाठी आयोजित केली असून त्यासाठी परवानगी मिळावी ही विनंती. विद्यार्थी संख्या कमी असल्याने खाजगी वाहनाने ही सहल आयोजित केली आहे. सदर सहलीत प्रा. नवनाथ गाडे मी स्वतः व प्रा. सौ. एस. ए. पाटील सहभागी होणार आहेत.

कळावे.

आपला विश्वासू,

प्रा. डॉ. गावडे आर. पी.

OK.

PRINCIPAL
ARTS, SCIENCE AND
COMMERCE COLLEGE
INDAPUR-413106 DIST-PUNE



Scanned with CamScanner

मराठी विभाग
शैक्षणिक सहल अहवाल
प्र. वर्ष - 2018-2019

# कुंभारगाव सहल- पक्षी निरीक्षण (MA मराठी - प्रथम वर्ष )

MA मराठी विभागाची सहल दिनांक २४/ ६ /२०१९ या तारखेला कुंभारगाव या ठिकाणी पक्षी निरीक्षणासाठी गेली होती . उजनी धरण हे भीमा नदीवर बांधलेले आहे या धरणाला यशवंत सागर अस म्हणतात. याची लांबी २५३४ मीटर आहे .याची पाणी साठवण क्षमता ५०.८५ टी एम सी इतकी आहे , धरणाची उंची ५६.४ मीटर आहे .हे धरण बांधण्यासाठी ११ वर्ष कालवधी लागला . हे धरण बांधण्यास १९६९ साली सुरुवात केली .यावरती अनेक लोकांची उपजीविका भागते .उजनी या धरणामध्ये आम्ही खूप विविध प्रकारचे पक्षी बोटी मध्ये फिरून पहायले , खूप छान वाटल निसर्गरम्य वातावरण , सभोवताली जिकडे तिकडे पसरलेले धरणाचे पाणी खूप आनंददायी क्षण या निसर्गरम्य वातावरणातून अनुभवायला मिळाले . आम्ही उजनी च्या पाण्यामधील असलेला जुना दगडी पूल पहिला . उजनी धरण बांधत असताना खूप गावं त्या पाण्यात गेलेली आहेत त्यातील काही घरांची पडक्या स्वरुपात अवशेष पाहायला मिळाली .पूर्वी धान्य साठवण्यासाठी कोणतेही साधन नव्हते त्यामुळे त्यावेळेचे लोक एक ठिकाणी मोठा खड्डा करून त्याठिकाणी धान्य साठवत असत ते हि पहिले एक छोट जून मंदिर पाहिलं . आम्हाला खूप काही पाहायला मिळाल आणि शिकायलाहि मिळाला. त्या ठिकाणी असणारी बरीच लोक मासेमारीवर अवलंबून आहेत .मासेमारी हा त्यांचा मुख्य व्यवसाय आहे तसेच पर्यटनासाठी हि तेथे अनेकजण येत असतात त्यामुळे तेथील लोकांना रोजगार मिळतो .

आम्ही अकराजण सहलीसाठी गेलो होतो..आम्हाला उमेश सल्ले यांनी त्यांच्या बोटीतून खूप वेळ फिरवल व खूप पक्षाचं दर्शन घडवल  पक्षाबद्दल खूप माहिती दिली . त्यांचे आभार मानावे तेवढे कमीच आहेत.त्याठिकाणी आम्ही खूप पक्षी आणि त्यांची पिल्ले व अंडी पहिली काही पिल्ले नुकतीच जन्मली होती तर काही पिल्ले अंड्यातून च डोकावत होती . ज्यावेळी आम्ही पक्षांची पिल्ले आणि अंडी पाहायला गेलो त्यावेळी सर्व पक्षाचा किलबिलाट झाला कदाचित त्यांनावाटल असेल कि माझ्या पिल्लांना किंवा माझ्या अंड्यांना घेऊन जातात कि काय वाटल असेल म्हणून सभोवती गोंगाटा करून सर्व पक्षी गिरख्या घेत होते . पक्षाचं आपल्या पिल्लावर असलेल प्रेम पाहायला व अनुभवायला मिळाल.

१) फ्लोमिन्गो -: या नावाचे पक्षी आम्ही खूप मोठ्या प्रमाणावर पहिले . हे पक्षी काही काळासाठी किंवा काही महिन्यासाठी उजनीच्या क्षेत्रात येतात आणि काही महिन्यांनी परत निघून जातात . या पक्षांचा रंग तीन प्रकारचा पहावयास मिळाला , वरती पंढरा , पंखाच्या आत गुलाबी व काळा ,उंच पाय मोठी चोच अशा प्रकारचे पक्षी होते .खूपच सुंदर पक्षी पाहायला मिळाले.

Scanned with CamScanner

२) ग्रेह्रोन हे हि पक्षी पाहायला मिळाले.

३) वारकरी पक्षी पाहायला मिळाले .

४) तसेच आणखी काही पक्षी पाण्यात मासे पकडताना दिले

सगळ पाहून झाल्यावर आम्ही मस्त जेवण केले ,ज्यांना शाकाहारी पाहिजे त्यांनी शाकाहारी खाल्ले व ज्यांना मांसाहारी पाहिजे त्यांनी मांसाहारी खाल्ले जेवण हि खूप छान होते खूप छान वाटल गावडे सर , गाडे सर व पाटील मॅडम यांनी आम्हाला खूप चांगले मार्गदर्शन केले व कोणत्याही प्रकारचे पक्षांच्या पिल्लाचे नुकसान होऊ नये याची काळजी घ्यायला सांगितले .

अशा प्रकारे आम्ही बोट मधून खूप प्रवास, केला विविध पक्षी पहायले , काही जुनी घरे मंदिरे पाहिली , उजनी धारणा विषयी प्राध्यापकांनी आम्हाला मार्गदर्शन केले .सर्वांचेच मनापासून आभार . धन्यवाद











PRINCIPAL
ARTS, SCIENCE AND
COMMERCE COLLEGE
INDAPUR-413106 DIST-PUNE

प्रगती लक्ष्मण गायकवाड

Scanned with CamScanner



PRINCIPAL
ARTS, SCIENCE AND
COMMERCE COLLEGE
INDAPUR-413106 DIST-PUNE

Scanned with CamScanner